१५१८

**महाराष्ट्र शासन**

**कृषि विभाग**

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प

३०-ब, अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.

दूरध्वनी क्र ०२२-२२१६३३५१ ई-मेल - mahapocra@gmail.com

जा. क्र. नादेकृसंप्र/ समाजशास्त्र/ क्षमता बांधणी/ प्र. क्र. ४५ /२०१९ 384 दिनांक- २० जून २०१९

**प्रति,**

**प्रकल्प संचालक, (आत्मा)**

**सर्व प्रकल्प जिल्हे (१५)**

**विषय :- नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प अंतर्गत कृषिताई (महिला शेतकरी मित्र) नामनिर्देशित करणे बाबत मार्गदर्शक सूचना.**

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प हा जागतिक बँक सहाय्यित प्रकल्प राज्यातील १५ जिल्ह्यांमधील ५१४२ गावांमध्ये राबविण्यास दि. १७.०१.२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आलेली आहे. प्रकल्पांतर्गत निवड केलेल्या गावामध्ये प्रत्येक कृषि संजीवनी समिती स्थापन करण्यात येणार आहे. प्रकल्पाच्या अंमलबजावणीमध्ये गावातील शेतकऱ्यांचा ग्रामपंचायतीसाठी ग्राम विशेषतः महिलांचा जास्तीत जास्त सहभाग अपेक्षित आहे. शेतकऱ्यांचा विशेषतः महिला शेतकऱ्यांचा सहभाग वाढविण्यासाठी केंद्र शासनाच्या National Mission on Agriculture Extension and Technology (NMAET) अंतर्गत मार्गदर्शक सूचनाच्या धर्तीवर प्रकल्पात समाविष्ट प्रत्येक गावामध्ये एक कृषिताई (महिला शेतकरी मित्र) यांना नाम निर्देशित करण्यात यावे. कृषिताई यांची प्रमुख जबावदारी प्रकल्प, कृषि विभाग, कृषि विज्ञान केंद्र (KVK), ग्राम पंचायत व अल्प व अत्यल्प शेतकरी यांच्यात प्रकल्पाच्या गरजेनुसार दुवा म्हणून काम करणे आहे. प्रकल्पातंर्गत 'कृषिताई' (A1.2a) घटकाच्या मार्गदर्शक सूचना सहपत्रीत करण्यात आलेल्या आहेत.

ग्राम कृषि संजीवनी समितीने सोबत जोडलेल्या मार्गदर्शक सूचना प्रमाणे प्रकल्पाच्या प्रत्येक गावासाठी एक कृषिताईचे नाम निर्देशन करावे. या संदर्भात समितीने मंजूर केलेल्या ठरावाची सत्यप्रत प्रकल्प संचालक आत्मा यांनी ग्राम कृषि संजीवनी समिती कडून मागविण्यात यावी आणि त्यांचे अभिलेखात ठेवावी व कृषिताई नाम निर्देशनाबाबतचा प्रगती अहवाल या कार्यालयास पाठवावा.

**प्रकल्प संचालक**

**नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, मुंबई**

**प्रत, माहितीस्तव:**

संचालक (आत्मा) कृषि आयुक्तालय,पुणे

**प्रत, माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव:**

१.कृषि सहसंचालक औरंगाबाद/ लातूर/अमरावती/ नागपुर / नाशिक

२.जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, सर्व प्रकल्प जिल्हे (१५)

३.उपविभागीय कृषि अधिकारी, सर्व प्रकल्प जिल्हे (१५)

४.अध्यक्ष, ग्राम कृषि संजीवनी समिती

## कृषिताई नाम निर्देशित करण्याकरिता मार्गदर्शक सूचना (A1.2a)

दिनांक ०७ नोव्हेंबर, २०१७ शासन निर्णय क्रमांक: नादेप्र-१०१७/प्र.क्र.११५/ राकृवियो कक्ष, शासन निर्णय प्रमाणे ग्राम कृषि संजीवनी मधे अकार्यकारी सदस्य म्हणून कृषिमित्र यांचा समावेश केलेला आहे. प्रकल्पाच्या अंमलबजावणीमध्ये गावातील शेतकऱ्यांचा ग्रामपंचायतीसाठी ग्राम विशेषतः महिलांचा जास्तीत जास्त सहभाग अपेक्षित आहे. महिला शेतकऱ्यांचा सहभाग वाढविण्यासाठी केंद्र शासनाच्या NMAET अंतर्गत मार्गदर्शक सूचनाच्या धर्तीवर प्रकल्पात समाविष्ट प्रत्येक गावामध्ये एक कृषिताई (महिला शेतकरी मित्र) यांना नाम निर्देशन करता येईल. ग्राम कृषि संजीवनी समितीने प्रकल्पात समाविष्ट प्रत्येक गावासाठी एका महिला शेतक-यांचे कृषिताई म्हणुन नामनिर्देशन करण्यात यावे. या साठी फक्त कार्यकारी सदस्यांचा निर्णय प्रक्रियेत सहभाग असावा. या संबंधात काही अडथळा / विवाद झाल्यास ग्राम सभा निर्णय घेईल.

कृषिताई प्रकल्पाचे अधिकारी/कर्मचारी, कृषि विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ, ग्राम पंचायत आणि अल्प व अत्यल्प शेतकरी यांच्यात दुवा म्हणून काम करतील आणि प्रकल्पमधे अंमलबजावणी बाबत जनजागृती करण्यास मदत करतील. ग्रुप ग्रामपंचायतीच्या बाबतीत जी गावे प्रकल्पा मध्ये समाविष्ट आहेत, अशा प्रत्येक गावासाठी एका कृषिताई चे नामनिर्देशन करण्यात यावे.

कृषिताईची संकल्पना केंद्र शासनाच्या कृषिमित्र (Farmers Friend) या विस्तार प्रेरक व सामाजिक संचेतक (social mobilizer) म्हणून ग्राम स्तरावर काम करणाऱ्या स्वयंसेवका सारखी आहे. त्यांनी या कामाकडे उदरनिर्वाहाचे साधन अथवा शासकीय नोकरी म्हणून पाहू नये. त्यांना देण्यात येणारी रक्कम ही त्यांनी केलेल्या खर्चाची प्रति पूर्ती म्हणून देण्यात येणार आहे या बाबीची जाणीव संबंधित कृषिताई यांना करून द्यावी.

कृषिताईचा कालावधी हा २ वर्षाचा, किंवा ग्राम कृषि संजीवनी समितीचा कालावधी काही कारणास्तव त्या अगोदर संपुष्टात आल्यास तोपर्यतचा राहिल. त्यानंतर नवीन कृषिताई चे नाम निर्देशन करण्यात यावे.

**कृषिताई म्हणून नाम निर्देशन करण्यासाठी पात्रता व निवड पदधती:-**

१. कृषिताई संबंधित गावाच्या रहिवाशी असाव्यात.
२. कृषिताई ही शेतकरी असावी आणि शेतीविषयक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यास उत्सुक असावी.
३. ज्या महिला शेतक-यांनी या आधीच कृषि विषयक प्रशिक्षण घेतले आहे त्यांना प्राधान्य देण्यात यावे
४. कृषिताई साक्षर असणे आवश्यक आहे. उच्च शैक्षणिक पात्रता आणि मराठी भाषेतून वाचन, लेखन व स्थानीय बोली-भाषेत (आदिवासी भाषेत-आदिवासी बहुल भागात) संभाषण करता येत असल्यास अशा महिलेस कृषिताई म्हणून प्राधान्य देण्यात यावे.
५. त्यांना मूलभूत संख्या ज्ञान असणे आणि मोबाईल वापरता येणे आवश्यक आहे.
६. स्वतः इतरांसाठी प्रेरणादायी असाव्यात व तिचे आकलन कौशल्य उत्तम असावे.
७. ग्राम कृषि संजीवनी समितीने कृषिताई चे नामनिर्देशन केल्याबाबतचा ठराव मंजुर करुन दयावा .
८. बेचिराख गावामधे कृषिताई चे नाम निर्देशन करण्यात येऊ नये .
९. कृषिताई चे नामनिर्देशन करतांना तीचा या पदावर कोणताही नोकरीचा अथवा इतर अधिकार असणार नाही याबाबत लेखी हमी पत्र ( सोबतच्या नमुन्यात) घेण्यात यावे.

**कृषिताई ची भूमिका आणि जबाबदारी -**

१. कृषिताई ची प्राथमिक जबाबदारी ही शेतक-यांना हवामान अनुकूल शेती पद्धतींचा अवलंब करण्यास उद्युक्त करणे व त्यासाठी आवश्यक मदत करणे ही आहे.
२. गावातील शेतकऱ्यांना संघटित करणे आणि त्यांनी प्रकल्प लाभासाठी केलेल्या अर्जाची छाननी करण्यासाठी समूह सहायकास मदत करणे.
३. गावातील सर्व समाजातील शेतक-यांशी संवाद साधून व त्यांना प्रकल्पाचा लाभ घेण्यासाठी प्रवत्त करावे.
४. ग्रामीण पातळीवर शेतीशाळा प्रशिक्षण आणि प्रात्यक्षिकांदरम्यान शेतकऱ्यांना सहभागी होण्यासाठी आणि उपस्थित राहण्याकरिता प्रोत्साहित करणे.
५. ग्रामसभेत हवामान अनुकुल शेती पद्धती व त्याची महिलांना असलेली आवश्यकता या विषयावर चर्चा घडवून आणणे.

६. शेतक-यांची क्षमता बांधणीची गरज ओळखणे व त्यादृष्टीने प्रकल्पांतर्गत आयोजित प्रशिक्षणामध्ये शेतक-यांना वेळोवेळी उपस्थित राहण्यास प्रोत्साहित करणे.
७. शेतकरी उत्पादक गट/ शेतकरी उत्पादक कंपनी/ स्वयं सहायता गट/ ग्रामीण पातळीवरील संस्थामध्ये महिला शेतक-यांचे प्रतिनिधीत्व वाढविण्यासाठी मदत करणे आणि त्यांचे व्यवसाय आराखडा तयार करण्यास मदत करणे.
८. कृषिताई समुह सहाय्यक व कृषि खात्याचे अधिकारी यांचेशी प्रकल्पाचे घटक राबविणेसाठी नेहमी संपर्कात राहतील.
९. ग्राम कृषि संजीवनी समिती आणि ग्रामसभेसमोर शेतक-यांचे विविध प्रश्न मांडणे व शेतक-यांच्या संबंधित बाबी मंजूर करून घेण्यासाठी मदत करणे.
१०. कृषिताई नी प्रकल्पाकरिता होणा-या राज्यांतर्गत व राज्याबाहेरील प्रशिक्षणास / प्रदर्शनास उपस्थित रहावे.
११. कृषिताई ने प्रकल्पात शिफारशी केलेल्या बाबीची स्वतः अंमलबजावणी करून इतरांना प्रोत्साहित करणे अपेक्षित आहे.

ज्या महिलेची कृषिताई म्हणून नाम निर्देशन होईल अशा महिलेस प्रकल्पा मार्फत शेतकरी प्रशिक्षण, अभ्यास दौरे यामध्ये सहभागी करुन त्यांची कौशल्य विकसित करण्यात येईल. तसेच तालुका स्तरीय बैठका, मेळावे व प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये निमंत्रीत करुन कृषि विस्तार व कृषि विषयक कामाची माहिती गावापर्यत पोहचविण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येईल.

**कृषिताई नी केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती प्रदान करण्याची कार्य पद्धती -**

१. कृषिताई नी वरील जबाबदारी पार पाडताना केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती ग्राम कृषि संजीवनी समिती प्रकल्पातंर्गत उपलब्ध निधीमधून करेल.
२. सदर खर्चाची प्रतिपूर्ती रु ५००/- प्रति माह ठोक या प्रमाणे प्रत्येक तिमाहीला देण्यात येईल.सदर रक्कम कृषिताई च्या बॅक खात्यात RTGS व्दारे जमा करण्यात यावी. प्रतीपुर्तीची रक्कम कृषि विभागाने वेळोवेळी कृषिमित्रासाठी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार राहिल.
३. या परिपत्रकाच्या दिनांकानंतर ग्राम कृषि संजीवनी समितीने कृषिताई ला नामनिर्देशित केले तेव्हा पासून तिचा खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात यावी.
४. कृषिताई ने केलेल्या कामाचा आढावा ग्राम कृषि संजीवनी समितीच्या मासिक बैठकीमधे घेण्यात यावा. तसेच प्रकल्प अमलबजावणीबाबत कृषिताई च्या सुचना देखील नोंदवून घ्याव्यात

कृषिताई यांनी कामकाज करत असतांना जर काही समस्या /तक्रारी उदभवल्यास त्यांची नोंद ग्राम कृषि संजीवनी समिती कडे करावी.

**प्रकल्प संचालक**
**नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, मुंबई**

कार्यालय : ग्राम कृषि संजीवनी समिती ...........
नाम निर्देशित केलेल्या कृषिताई बाबत माहिती

कृषि ताई फोटो

- कृषिताई चे नाव ................................वय.................................
- वडीलांचे / पतीचे नाव ..................... आईचे नाव :

  ...............................................
- कृषिताई चा संवर्ग : अनु. जाती/ अनु. जमाती/ई.मा.व./सर्वसाधारण
- पत्ता - .......................................................................जि. -................................
- कुटुंब सदस्य संख्या- ..............................
- संपर्क क्रमांक : मोबाईल ............................................
- शिक्षण- ..............................
- कुटुंबाचे जमिन धारणा क्षेत्र .............................................हे ...............................आर.
- बागायती ......................हे......................आर./कोरडवाहू..................हे................आर.
- सिंचनाच्या सुविधा : स्त्रोत.............................................................................................

| अ.क्र. | हंगाम | पिके | क्षेत्र (हे.) | उत्पादन ( क्वि.) |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

- शेतीपूरक व्यवसाय असल्यास व्यवसायाचे नाव -

  ..................................................................................................................................

  ......
- बचत गट/ शेतकरी गटाचे सदस्य असल्यास गटाचे नांव

  ......................................................................

- शेतकरी उत्पादक कंपनीचे सदस्य असल्यास कंपनीचे नाव -

  ..................................................................................

- युवक मंडळ/महिला मंडळ इत्यादीचे सदस्य असल्यास त्याचे नाव -

  ......................................................................

- कृषि विषयक पुरस्कार मिळाला असल्यास त्याचा तपशिल-

  ..........................................................................................................................................................

- शेती विषयक प्रशिक्षण घेतले असल्यास त्याची माहिती -

  ......................................................................................................................................................

- शेती विषयक उपक्रमामध्ये नमूद करण्यासारखे नैपूण्य -

  ........................................................................................................................................................

- बँकेचे नाव - ...............................खाते क्र. -....................IFSC कोड: .....................

कृषिताई स्वाक्षरी

नाव

सोबत : ओळखपत्र (आधार कार्ड/मतदान कार्ड), बँक पासबुकची झेरॉक्स, ७/१२, ८ अ, शैक्षणिक पुरावा.

# हमीपत्र

दिनांक:.....................

प्रति,
सरपंच तथा अध्यक्ष,
ग्राम कृषि संजीवनी समिति,
....................................

**विषय: -नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत कृषिताई म्हणून काम करणेस इच्छुक असलेबाबत...**
**संदर्भ: ग्राम कृषि संजीवनी समिती................. (गावाचे नाव) ठराव क्र. दिनांक .................**

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्रान्वये माझे नामनिर्देशन कृषिताई म्हणून करण्यात आलेले आहे. सदर सेवांचे स्वरूप आणि कामाचा कालावधी मी समजून घेतला असून मला तो पूर्णत: मान्य आहेत. त्यानुसार मी सदर प्रकल्पांतर्गत माझी सेवा उपलब्ध करून देण्यास संमती कळवीत आहे. हे काम माझ्यासाठी उदरर्निवाहाचे साधन असणार नाही व मला कोणत्याही प्रकारे शासकीय नोकरीसाठी दावा करता येणार नाही याची मला जाणीव आहे. तसेच काही कारणास्तव मला हे काम करणे शक्य नसल्यास एक महिना अगोदर मी लेखी कळविण्याची दक्षता घेईन.

(कृषिताई)
सही:-
नाव:-
पत्ता:-